# जुने गोवे कृषिविज्ञान केंद्रात बियाणे पेढी

## प्रधान वैज्ञानिक बी. एल. काशिनाथ सेवानिवृत्त

**प्रतिनिधी**
पणजी

जुने गोवे येथील कृषी विज्ञान केंद्राचे प्रधान वैज्ञानिक बी. एल. काशिनाथ हे आपल्या अखंड ३८ वर्षाच्या सेवेतून निवृत्त झाले. आपल्या दीड वर्षाच्या गोव्यातील सेवेत असताना त्यांनी कृषी विज्ञान केंद्रातर्फे गोव्यातील विविध भाज्यांच्या बियाणांची एक मोठी पेढी तयार करण्यात त्यांना आलेले यश व शेतकऱ्यांसाठी प्रथमच सर्व बियाणे एकत्रित बॉक्समध्येही त्यांनी उपलब्ध केले आहे.

डॉ. बी. एल. काशिनाथ हे चांगले अनुभवी आणि कृषी क्षेत्रातले वैज्ञानिक आहेत. ३० वर्षे त्यांनी बंगळूर मध्ये सेवा केल्यानंतर त्यांची अंदमान निकोबार येथील कृषी केंद्रावर ज्येष्ठ वैज्ञानिकपदी नियुक्ती झाली. त्यानंतर दीड वर्षापूर्वी गोव्यात कृषी विज्ञान केंद्रावर प्रधान वैज्ञानिकपदी बढती देण्यात आली.



डॉ. बी. एल. काशिनाथ

३८ वर्षांच्या सेवेनंतर सोमवारी ते सेवानिवृत्त झाले.

आपल्या गोव्यातील कारकिर्दीत राज्यातील विविध भाजीपाल्यावर संशोधन केले व त्यातून अनेक जाती त्यांनी प्राप्त केल्या. त्यांच्यावर संशोधन केले. त्यानंतर त्यावर पुन्हा प्रयोग केले. सर्व प्रयोग यशस्वी झाले. त्यानंतर बियाणांसाठी असलेली सर्व प्रमाणपत्रे व मान्यता मिळविल्यानंतर सध्या या कृषी विज्ञान केंद्रात ४०० किलो एवढी गोमंतकीय भाज्यांची बियाणे तयार करून ठेवलेली आहेत.




डॉ. बी. एल. काशिनाथ म्हणाले की, गोव्यातच विविध प्रकारच्या भाज्या आहेत. पालेभाज्या, फळभाज्या त्यांवर देखील संशोधन करणे आवश्यक आहे. आम्ही ज्या भाज्या आणि फळभाज्या मिळविल्या त्यातही विविध ठिकाणी गोव्यात निर्माण होतात. त्यावरही संशोधन केले. ७ रेषांचा भेंडा हा केवळ गोव्यातच आहे. त्यालाही केंद्र सरकारने मान्यता दिलेली आहे. सध्या आम्ही १० भाज्यांवर संशोधन करून ४०० किलो बियाणी तयार केलेली आहेत. ५ सचेट असलेले एक बॉक्स तयार करून हे बॉक्स केवळ २०० रुपयात शेतकऱ्यांना उपलब्ध होईल. प्रत्यक्षात प्रत्येक सचेटला ५० रु. आकारले जातील.

डॉ. बी. एल. काशिनाथ यांनी आपली अखंड सेवा भारतीय कृषी विज्ञान केंद्रासाठी वाहिली. डॉ. चाकुरकर यांनीही शुभेच्छा दिल्या.